जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - १३२ दिनांक -२३/०२/२०२४**

लोणीकाळभोर पोलीस स्टेशन, पुणे शहर

## संतोष ऊर्फ आण्णा किसन देवकर (टोळी प्रमुख) व त्याचे इतर ५ साथीदार यांचे विरुध्द मकोका अंतर्गत कारवाई

सदर गुन्ह्यामधील फिर्यादी यांचे मालकीचे ऊरळी देवाची गावचे हदीतील गोडावुनमध्ये यातील आरोपी व त्यांचे साथीदार यांनी मिळुन "आम्ही माथाडी बोर्डाचे नेते असुन गोडावुन मधील काम आमचे माथाडीचे कामगार करणार असे" म्हणून फिर्यादी यांना याबाबत कोणतीही नोटीस न देता त्यांचे गोडावूनमधील काम बंद केले तसेच काम चालु करायचे असेल तर **एका गाडी पाठीमागे १५,०००/- रूपये दया तरच काम चालु करा** त्यावर फिर्यादी यांनी गोडावूनमध्ये काम करण्यासाठी माथाडी कामगार ठेवायचे नाहीत व माथाडी कामगार परवडत नाही असे म्हणाले परंतु आरोपी यांनी निदान **एका गाडी पाठीमागे ७०००/ रूपये दे** नाहीतर तुझ्या गोडावुन मध्ये येणा-या गाडया तु कशा खाली करतो तेच बघतो असे म्हणुन शिवीगाळ दमदाटी करुन जिवे मारण्याची धमकी दिली त्याबाबत फिर्यादी यांनी लोणीकाळभोर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने लोणीकाळभोर पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं.४८/२०२४ भादविक ३८७,१४३, १४७,१४९,५०४ ,५०६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

**दाखल गुन्हयाच्या तपासा दरम्यान आरोपी नामे** १) संतोष ऊर्फ आण्णा किसन देवकर वय ३४ वर्ष रा.ॲक्वा मॅजेस्टिक सोसा. डी बि.फ्लॅट नं. २०४ फुरसुंगी ता. हवेली जि पुणे २) शेखर अनिल मोडक वय २९ वर्षे रा. वडकी गावठाण, सरकारी विहीरी शेजारी ता. हवेली जि. पुणे. ३) साहस विश्वास पोळ वय २५ वर्ष रा. सिध्दीविनायक अपार्टमेंट, जे १०१, वडकी गाव, ता.हवेली, जि. पुणे. **यांना दाखल गुन्ह्यात अटक केली असून,आणखीन** तीन पाहीजे आरोपी आहेत.

नमुद आरोपी **१) संतोष ऊर्फ आण्णा किसन देवकर (टोळी प्रमुख)** हा लोणीकाळभोर पोलीस स्टेशन अभिलेखावरील सराईत गुन्हेगार आहे त्याने संघटित गुन्हेगारी टोळी तयार केली असुन, त्याने बेकायदेशीर मार्गाने स्वतःसाठी किंवा अन्य कोणत्याही व्यक्तींसाठी गैरवाजवी आर्थिक फायदा व इतर फायदा मिळवण्याच्या उद्देशाने संघटीत गुन्हेगारी संघनेचा सदस्य म्हणून किंवा संघटनेच्या वतीने एकट्याने किंवा संयुक्तपणे हिंसाचाराचा वापर करुन किंवा हिंसाचार करण्याची धमकी देऊन किंवा धाकदपटशा दाखवुन किंवा जुलूम जबरदस्ती करुन किंवा अवैध मार्गाने आपली बेकायदेशीर कृत्य चालु ठेऊन संघटना किंवा टोळी म्हणून संयुक्तपणे संयुक्त गुन्हेगारी कृत्य करणारा गट तयार केला असुन सदर टोळीने मागील १० वर्षात खुन करणे, खुनाचा प्रयत्न करणे, गुप्तपणे किंवा गैरपणे एखाद्या व्यक्तिला परिरध्द करण्यासाठी तिचे अपनयन किंवा अपहरण करणे, बलादग्रहण करण्यासाठी एखाद्या व्यक्तिला मृत्यु किंवा जबर दुखापत यांची भिती घालणे, बेकायदेशीर जमाव जमवणे, बेकायदेशीररीत्या हत्यारे बाळगुन दहशत निर्माण करणे इत्यादी प्रकारचे गुन्हे केल्याचे निदर्शनास आले आहे.

सदरचे गुन्हे हे अवैध मार्गाने स्वतःसाठी व इतरांसाठी गैरवाजवी आर्थिक फायदा व इतर फायदा मिळविण्यासाठी, टोळीचे वर्चस्वासाठी व दहशत कायम ठेवण्यासाठी तसेच नागरिकांच्या मनात भिती निर्माण करण्यासाठी सातत्याने चालु ठेवुन संघटना किंवा टोळी म्हणुन संयुक्तपणे गुन्हेगारी कृत्य करणारा गट तयार केला असुन, त्यांनी पुन्हा पुन्हा गंभीर स्वरुपाचे गुन्हे केलेले आहेत.

दाखल गुन्हयामध्ये महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायदा सन १९९९ चे कलम ३(१)(ii) ३(२),३(४) चा अंतर्भाव करणेकामी लोणीकाळभोर पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री.शशिकांत चव्हाण यांनी मा. पोलीस उप-आयुक्त परि-५, पुणे शहर श्री. आर. राजा यांचे मार्फतीने मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रदेशिक विभाग, पुणे शहर श्री. मनोज पाटील यांना प्रस्ताव सादर केलेला होता.

सदर प्रकरणाची छाननी करुन लोणीकाळभोर पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं. ४८/२०२४ भादविक ३८७,१४३,१४७,१४९,५०४,५०६ अन्वये दाखल असलेल्या गुन्ह्यामध्ये महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा सन १९९९ चे कलम ३(१)(ii)३(२),३(४)चा अंतर्भाव करण्याची मा.अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग, पुणे शहर श्री.मनोज पाटील यांनी मान्यता दिलेली आहे.

सदरची कामगिरी मा.पोलीस आयुक्त, पुणे शहर श्री. अमितेश कुमार, मा.पोलीस सह आयुक्त, श्री. प्रविण पवार,मा.अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग श्री.मनोज पाटील,मा.पोलीस उप आयुक्त, परि- मंडळ ०५,श्री.आर.राजा, मा.सहा.पोलीस आयुक्त,हडपसर विभाग, श्रीमती. अश्विनी राख यांचे मार्गदर्शनाखाली लोणी काळभोर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. शशिकांत चव्हाण, पोलीस निरीक्षक,(गुन्हे) श्री.सुभाष काळे, सपोनि किशोर पवार, पोउनि अमोल घोडके, सर्वेलन्स अंमलदार तेज भोसले, संदीप धनवटे, प्रशांत नरसाळे, मल्हारी ढमढेरे, रोहिणी जगताप यांनी केली आहे.

मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.अमितेश कुमार यांनी पोलीस आयुक्तालयाचा कार्यभार घेतल्यानंतर गुन्हेगारी नियंत्रणावर भर देवुन शरिराविरुध्दचे व मालमत्तेविरुध्द गुन्हे करणारे व लोकांमध्ये दहशत निर्माण करणारे सराईत गुन्हेगार यांचे हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवुन, गुन्हेगारीचे समुळ उच्चाटन करण्याचे उद्देशाने कठोर पावले उचलण्याबाबत सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांना निर्देश देण्यात आले आहेत. **२०२४ या चालु वर्षातील मकोका अंतर्गत केलेली ही १३ वी कारवाई आहे.**